Estd. 1962
"A++" *Accredited*
*by* NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

विद्यापीठ सर्व अधिविभागांना कळविण्यात येते की, सन २०२१–२०२२ या शैक्षणिक वर्षामध्ये आपल्या अधिविभागाकडील पदवी व पदव्युत्तर नियमित अभ्यासक्रमास विविध प्रवर्गनिहाय प्रवेश घेतलेल्या व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना'' व ''डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना'', ''विविध राखीव प्रवर्गनिहाय विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार शिष्यवृत्ती/ फ्रिशिप योजना'', ''अल्पसंख्यांक विद्यार्थी शिष्यवृत्ती'', ''सेंट्रल सेक्टर स्कॉलरशीप'', ''एकलव्य आर्थिक सहाय्य योजना'', ''अपंग शिष्यवृत्ती'', ''माजी सैनिक सवलत'', ''राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती'', ''गणित व भौतिकशास्त्र गुणवत्ता शिष्यवृत्ती'', ''स्वातंत्र सैनिकांच्या मुलांसाठी शैक्षणिक सवलत''इ. करीता ऑनलाईन अर्ज करू ईच्छिणा–या सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनीच्याकडून फॉर्म भरून घेण्याची कार्यवाही महाडीबीटी पोर्टलवर शासनामार्फत सुरू करण्यात आलेली आहे. सदर शिष्यवृत्ती/सवलतीसाठी अर्ज करू इच्छिणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना दि. १४/१२/२०२१ ते ३१/०१/२०२२ पर्यंत https://mahadbtmahait.gov.in/ या संकेतस्थळावरून ऑनलाईन अर्ज सर्व कागदपत्रांसह भरणा करावयाचे आहेत.

या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षात आपल्या अधिविभागात शिकत असलेल्या व उपरोक्त योजनेस ऑनलाईन अर्ज करू इच्छिणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी https://mahadbtmahait.gov.in/ या संकेतस्थळास भेट देवून आवश्यक त्या कागदपत्रांसह ऑनलाईन अर्ज भरण्याबाबत संबंधिताना सूचना देण्यात याव्यात. तसेच सर्व संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना सदरची बाब निदर्शनास आणण्यात येवून त्यांच्याकडून विहीत मुदतीत ऑनलाईन अर्ज भरून घेण्यात यावेत.

सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरणा केल्यानंतर त्याची हार्ड कॉपी आवश्यक त्या कागदपत्रांसह आपल्या अधिविभागामार्फत शिष्यवृत्तीनिहाय विद्यार्थ्यांच्या यादीसह स्वतंत्र फायलींग करून पुढील कार्यवाहीसाठी पीजी प्रवेश विभागास दि. ०५/०२/२०२२ पर्यंत पाठवून द्यावी.

प्र.कुलसचिव

जा.क्र. – पी.जी.प्रवेश विभाग / 530
दि. 03 JAN 2022

प्रति,

१. सर्व अधिविभागप्रमुख/संचालक/समन्वयक,
पदवी व पदव्युत्तर अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
२. पी.जी./बीयुटीआर विभाग
३. मा. समन्वयक, इंटरनेट विभाग
....सदरचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे.
४. मुलांचे वसतिगृह/मुलींचे वसतिगृह/डॉ. आप्पासाहेब पवार विद्यार्थी भवन.
५. जनसंपर्क कार्यालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**टिप :– सदरचे परिपत्रक हे अत्यंत महत्वाचे असून, आपल्या अधिविभागामध्ये प्रवेश घेतलेल्या संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना याची माहिती देवून ते विद्यार्थ्यांना दिसेल अशा पद्धतीने आपल्या अधिविभागाच्या नोटीस बोर्डवर लावण्यात यावे.**